म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६२

# उत्सव

राम कोत्तापल्ले



REFBK-0025573
REFBK-0025573

संदर्भ काव्य
२५५२
२५५७३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 JUN 1988

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

# उत्सव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

राम कोत्तापल्ले

REFBK-0025573

REFBK-0025573

कुशा प्रकाशन, औरंगाबाद

प्रकाशन क्र. ५

प्रकाशक :

सौ. अनुराधा पाटील

कुशा प्रकाशन,
' अभिजित ', ११९, म. गांधी नगर,
स्टेशनरोड, औरंगाबाद ४३१००५

© सर्व हक्क स्वाधीन

मुखपृष्ठ : दिनेश हुलगेरी

मुद्रक : अजित शशिकान्त देव

मुद्रणस्थळ : भारत मुद्रण मंदिर, पुणे

किंमत रु. २०–००

" या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य
संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

आई-वडील

आणि

गुरुवर्य धर्मराज भोईर

यांना



मताए लौहो कलम छिन गयी तो क्या गम है
के खूने दिल में डुबो ली है उँगलियाँ मैंने
जुबाँ पे मुहर लगा है तो क्या, के रख दी है
हर एक हल्क-ए जंजीर में जुबाँ मैंने

—फैज अहमद फैज

ऋणनिर्देश : अधिष्ठाता वसंत परब, प्रा. रविंद्र किबहुने, प्रा. सुधाकर यादव, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि श्री. जयंत वैद्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१

असं कसं होतं ?
पक्षी दू ऽ ऽ र उडून जातायत
आकाशात वर वर
मी गुंफायला पाहातोय
त्यांचे थवे माझ्या कॅनव्हासभर. . . .
पक्षी परतत का नाहीत झाडावर ?
की केला हल्ला कुणी त्यांच्या घरट्यांवर ?
आणि. . .
आणि तरीही मी कॅनव्हास ताणल्याची
स्वप्नं पडतायत माझ्या कपाळावर. . .

●

२

रस्त्यावर गळणाऱ्या टिपूर टिपूर घामातून
जेव्हा भुकेची ज्वाला प्रज्वलित होते
तेव्हा माना खाली घालाव्या लागतात
मूग गिळून...
पण एक मात्र लक्षात ठेवायला हवंय
पाखरं अजून झोपली आहेत
ती जेव्हा उठतील अनादि काळात दडलेल्या तिमिरातून
तेव्हा तुम्ही एकेकजण निशाणा ठरणार आहात
कोळून पिलेल्या कागदाचा...
डबडबून आलेल्या अश्रूंचा...
तेव्हा तुम्हाला आठवाव्या लागतील
मदोन्मत्त बनून झाडलेल्या गोळ्या...

●

३

गजरा विणत विणत एकटक धूम्रवलय
तेव्हा मावळत असतो चंद्रमा. . . एका अंधाऱ्या रात्री
जागा होऊन पाहातो. . . फुटतात चष्म्याच्या काचा
आणि विखुरल्या जातात दाही दिशांनी
. . . तेव्हा मी माझा नसतोच. . .
धुरावर धूर सुटावेत आकांताचे आणि चार भिंतीतल्या एकांताचे
की जशा तडकून जाव्यात काचा
आणि भिनल्या जाव्यात रक्तारक्तातून
तेव्हा पेटत असतं रक्त. . . आणि विक्षिप्तपणे धमन्या रडताना
ऐकणं असह्य होतं. . . रडणं रडणाऱ्याचं. . .
भिरकावला जातो गजरा मच्छरदाणीच्या गूढ गर्भातून
. . . ओशाळलेला चेहरा पुन्हा शोधत बसतो
अंधाऱ्या रात्रीचा चंद्रमा. . . टिपं गाळणारी आसवांची लाल लाल
रंगून जातो माझा कॅनव्हास अंधाऱ्या पार्श्वभूमीवर
. . . गुंफत बसतात कथा आणि व्यथा ह्या एकान्त मरणाच्या. . .

●

४

जेव्हा काळोख्या रात्री दडलेल्या उध्वस्त स्वप्नांचा
घुंगुरनाद होतो तेव्हा त्याला सांगावं वाटतं
बावा रे ! रात्र रक्ताळलेली आहे माझी. . . शूर्पणखेसारखी. . .
शोधायच्या असतात दिशा दिशाहीनांसारख्या
तेव्हा उमलत जातात उध्वस्ताचे एकेक तरंग
निर्जन वस्तीतल्या चांडाळणीसारखे. . .
काळोखानं घेरलेली रात्र स्मशानात नेऊन सोडते
पोटच्या गोळ्याचं दुरावलेलं अंतर
हरिश्चंद्रासारखं जोडून घेण्यासाठी. . .पिळवटलेल्या आतड्याला
फुललेले गुलमोहराचे ताटवे. . . सजणीची रात्र. . .
वास करीत असलेला धुंद मधुचंद्र. . . कलेकलेनं वाढणारा हर्ष. . .
सगळे पोके होऊन बसतायत
नैराश्याच्या अथांग. . . निर्जन कुत्सित हसणाऱ्या बेटांवर. . .

●

५

शाप भोगतोय स्वप्नांच्या कविता लिहिण्याचा
कुठंच सापडत नाही परीस. . . बरं झालं
नसता, झालं असतं सोनं माझ्या स्वप्नांचं. . .
. . . परीस लागतो हाताला नि गंज चढत जातो
बोटांपासून मेंदूपर्यंत
" जसं मरण कुजावं. . . हळूहळू. . . मिठाच्या पोत्यात तसं
. . . . . . . . .
गुलाम अली खाँ नं काबूत ठेवलं सतारीला
म्हणून बरं झालं, . . आम्ही तरी आमचे झालो
" जिंदगीभर गाफील राहा " म्हणताना
नसता हातचे पोपट उडून गेले असते. . . सतारीसकट. . .
तर ओढावी लागली असती कातडी अंगावर
. . . स्वप्नांच्या उध्वस्त भूमीसाठी. . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
आता मेणबत्त्या विझत आल्यात. . . आता मला विझायला हवं
नसता रोखून पाहाणारी दुनिया हसेल मच्छरदाणीतून
माझ्या विखुरलेल्या चष्म्याच्या काचांना
. . . खरंच तडकली का काच चष्म्याची ?
आता विझायला हवंय. . . दुनिया कुछ गहिरी म्हणून
. . . सॉक्रेटिस फक्त तुझ्यासाठी !

●

६

आपण दोघं गात असतो. . . झडलेल्या गुलमोहराखाली
ओसरलेल्या मैफिलीसारखे
स्वप्नांचे तरंग उडून जातायत
पहाटेच्या मोरपंखासारखे. . . तरीही आपण गातच असतो
कारण दिवस पानझडीचे आहेत ना !

•

७

गूढ गंभीर मशीदीचा गाभारा. . . कुणीतरी रंगवलेला
शांत शांत आलाप . . . बाजूच्या हॉटेलात कंटाळलेले शराबी
" चहा पितात " नि हसतात मशीदीला. . .
तेव्हा कोसळायला लागतात मेणबत्त्या एकेक
चर्चमधल्या. . . ज्युलीच्या लिप्स्टिक लावलेल्या ओठांसारखे. . .
. . . शराबी पूर्णपूर्ण झिंगतात. . . पक्षी का उडून जातात ? थम्सअप्सारखे
एकाकी चेहरा अल्लाचा. . . उल्लाउद्दीनला बोलावणारा
आणि हलायला लागते मशीद रंगवलेली
शॅडो दूरवर. . . माझ्या पांढऱ्या करकरीत शर्टावर
बटनं कुरतडून टाकतात
एकाकी तेवणाऱ्या शर्टावरील " लाइट स्पॉटसना ". . .
अंधार पुरापुरा एकाकी निद्रिस्त अवस्थेत. . . पोपटाच्या चोचीसारखा
. . . स्वातंत्र्याच्या कबुतरासारखा......
अचानक स्फोट मशीदीत
आणि अल्ला रस्त्यारस्त्यावरून पोटाच्या याचनेसाठी......
......झेंड्याच्या मिनाराची शॅडो ढळणारी
चंद्रचकोरीकडं मशीदीतल्या. . . माझ्या कोसळणाऱ्या भिंतीसुद्धा सामील
आणि सुरुंगसुद्धा
...... साला आपणच च्यूते झालो सगळयांना च्यूते म्हणताना......
पुन्हा गूढगंभीर मशिदीचा गाभारा......कुणी रंगवलाय ?
आपलं कुणीच कसं नाही इथं ?
तिरडी आनंदानं स्वीकारण्यासाठी............
आता शराबी पूर्ण झिंगतात......नजरेसमोरून पांगतात
जशा दूरवर पसराव्यात मधमाश्या......मध संपल्यानंतर तसे
स्वातंत्र्याचा......लोकशाहीचा......उद्घोष करत......

●

८

एकेक फांद्या हलत जाव्यात भयाण अंधारात
ठाण मांडून बसलेल्या कबरीवर......तसे जीवघेणे शब्द
रेंगाळणारे नि कुत्सितपणे हसणारे ओठांवर......
शब्द शब्द ठरू नयेत......आलाप आलाप ठरू नयेत
तसे हे दिवस मेख मारून बसलेल्या स्मशानातील भूतासारखे......
......आता पानं पानं थिजून जातायत समुद्राकाठची
आणि सुकायला लागलीयत फुलं पळसाची
प्लासीच्या युद्धभूमीवरल्यासारखी......उध्वस्त......उध्वस्त......
आता इथून तिथून साम्राज्य बाजीरावांचं
मिण्‌मिणत्या समईसमोर घंटा वाजवणारं...पिवळ्याधम्मक पंचावर?...
......आता सगळेच आवाज......जल्लोष स्थिर होत चाललेत
चर्चमधल्या मिणमिणत्या मेणबत्तीसारखे
सगळ्यांनी गुंतवले पंख एकमेकात
नि मी
एकटाच उभा निद्रिस्त चौथऱ्यावर
.....झिंदाबादच्या घोषणा आकाशभेदी बनवत......

•

९

ह्या ऐतिहासिक शहरात पाऊल ठेवलं तेव्हाचा क्षण
क्षण : क्षणभंगुर
शहर नटलेलं थटलेलं आणि आतून थोडंसं फाटलेलं
स्वतःचं काळीज विकलेलं शहर . . .
शहरात माणसंदिनसं . . . बाया . . . स्त्रिया . . . पोरं . . .
आणि डावीकडच्या फूटपाथवर बायाबापडचा. . . एकमेकींचा चेहरा
न्याहाळीत
. . . आहे ते आतच ठेवून अपेक्षा करणारं शहर
शहर. . . गिळू पाहाणारं अजस्त्र विळख्यानं प्रस्थापिलेल्या अजगरासारखं
शहर . . . मासळी बाजारासारखं गजबजलेलं
शहर. . . स्वतःच्या गगनचुंबी इमारतीचं प्रतिबिंब रस्त्यावर पाडणारं
स्वच्छ शहर . . . "आत्ताच बायाबापडचा कागद वेचून गेल्यात"
शहर विस्कटलेल्या केसांनी . . . आसुसलेल्या डोळ्यांनी . . .
लाकडाच्या पायांनी . . . वस्त्रहीन अंगानं न्याहाळणारं
तांबडे डोळे न्याहाळतात शहराला . . . टोप्या पाडणाऱ्या इमारतींना
आणि आतलं पाणी आतच झिरपतं . . . डंख ढेकळासारखं . . .
अचानक मशाली विझतात चौकाचौकातल्या
आणि शहर कसं गजबजतं . . ट्यूब लाईटसनी लखलखीत
. . . ह्या ऐतिहासिक शहरात पाय
"आठवली मला माझी गोधडीची माय . . ."
माझ्या डोळ्यात पांढरे झेंडे
तेव्हा शहर लिपस्टिक लावून खदखदा हसतंय . . .

●

१०

माझ्या वस्तीतल्या माणसा . . . दु:ख विकू नको गिळू नको
पेटव अश्रूंना खुशाल
आज नव्हे तो उद्या होईल तीच
तुझ्या पोराच्या हातातली मशाल . . .
उष:काल होईल तुझ्या वस्तीत
तेव्हा तू विलीन होशील सूर्यास्तात . . . डोकावेल प्रकाशाचा कवडसा
तेव्हा निवडुंग सुद्धा फुलून निघतील तुझ्या वस्तीत
गेलेल्या पीळदार होतील पुन्हा जशाच्या तशा मिशा
आणि फुटतील त्या पंजाब्याच्या हॉटेलातल्या कपबश्या . . .
तुझ्या झोपडीखाली चक्क मशाली लकाकतायत
अन पाखरं विहरू लागलीयत आकाशात
तेव्हा काळोखगर्भ विसरू नको : स्वामीहीन
चालून येतील हुंकार काळाचे तुझ्या ओठांवर
तेव्हा कुणीतरी हळूच हात फिरवेल तुझ्या रिकाम्या पोटावर . . .
तू मारतोस बोंबा . . . बेंबीच्या देठापासून
तेव्हा शहर कसं पाजळून निघतं . . . लिपस्टिकच्या ओठांपासून
आता सूर्य
तुझ्या वस्तीकडं वळतोय . . . ठेव दार तुझ्या झोपडीचे
उघडं सताड
अन् भूकंप करायला लागेल तुझ्या वस्तीतलं भिताड . . .

११

इथं पोळ्याचा सण भारीच होतो
ठरलेल्या वेळेवर बैलांना बाशिंगं बांधतात
(तेंही मुकाट्यानं बांधून घेतात . . .)
उत्सव . . . जल्लोष . . .सण. . .यात्रा . . . रंगात येते. . .
आणि बैल उधळायला लागतात दाही दिशांना
बेलगाम चौखूर घोड्यांसारखे ....
त्यांच्या मुंडावळ्या हळूहळू ढळतात सूर्यास्ताकडं कालिमा फासून
बाकी बैलांना नाचवण्याशिवाय
इथल्या दगडात सामर्थ्यच काय उरलंय ? ......
बैल बिच्चारे खूष असतात आतून . . . बाशिंगासाठी
आपोआप गोठ्याकडं वळतात . . . पळतात . . . वळवळतात
आणि खुरं झाडू लागतात डख्ख जमीनीत
तेव्हा कालांशान ते विरघळत विरघळत जातात : रवंथासाठी
आता बैलांची स्वप्नंही
उतू जातायत : रवंथाच्या फेसातून
आणि
आणि गळायला लागतोय रंग शिंगातून
तेव्हा त्यांना
स्पष्ट काळोख दिसायला लागतो
कपाळावरील पोळ्याच्या भिंगातून

●

१२

शब्द कसे झुलून येतात
फुलून येतात
माझ्या डोळ्यांसाठी ... तुझ्या ओठांसाठी
आणि
आत आत झिरपणाऱ्या बेंबीच्या देठांसाठी ...

वर आकाशात झिंगणारे पक्षी
फिरत राहातात ... झुरत राहातात
तुझं नि माझं गातात विरह गाणं
आणि
एकाएकीच मालवून जातं श्वासांचं चांदणं ...

खिडकीच्या आत बंदिस्त पाखरं
एकाएकीच डहुळतात ... पहुडतात
फैलावेत तुझे माझे हात चितेवर जळण्यासाठी
आणि
नावेतील नावाडी हळूच पळण्यासाठी ...

रात्रीच्या अंधारात
दिवे मालवतात . . . मने हेलावतात
तुझ्या माझ्या हृदयावर काळोखनक्षी होतात
आणि
तुझ्या वाटेवर माझे डोळे विझून जातात
रोजच्या दुपारी
मेघ येतात, न बरसता निघून जातात
तुझे माझे पंख वाऱ्यावर फडफडतात
आणि
न जाणो गुलमोहराला पक्षी उगीच लगडतात . . .
फुलदाणीतली फुलं
मलूल होतात . . . विस्कटून जातात
तुझ्या निळ्या डोळ्यात माझ्या शब्दांचं पात्र
आणि
एकाएकी अंधारुन येते वादळाची रात्र
दोन्हीही हातांना
अश्रूंचा सुवास . . . आता तू हवीस
चिंब डोळ्यातलं पाणी वाहाण्यासाठी
आणि
मला सरणावर जळतांना पाहाण्यासाठी . . . . . .

●

१३

जलते हैं हम
रोज ये इष्ककी महेफ़िलमे
...कसं काय ॲब्स्ट्रॅक्ट होत जातं
आख्खं विश्व : वितळल्यासारखं
माझं प्रतिबिंब कुठंच दिसत नाही
नसेल कदाचित् ..... कदाचित् असेलही
..........................................
बगळे अल्लाद मासे गिळतायत
तरंग तरंग डोहात......................

•

१४

चपलेमधील तीक्ष्ण खिळ्यांना
सांभाळणं वरचेवर कठीण होतंय
रक्त . . . पाय . . .
जखमा . . . जखमा सर्व अंगभर
असून असावं नसल्यापेक्षा
उसवत जावं आपणच
सूर्य मावळताना
ह्या जिंदगीवर कफनी टाकून
दफनीत गडप होताना
......................
पक्षी अल्लाद उडतायत
भुवयातून . . . भुवयापर्यंत . . .
डोळ्यांच्या सीमारेषा आकुंचित होतायत आता .....

●

१५

सांज देठांवरून अल्वार सरकते
तेव्हा माझं इथं कुणीच नसतं
फक्त असतात
गाजलेली नावं
मी उसवत निसवत जातोय
गाजलेल्यांची नावं सांगताना
: आतून
अखेर तिरडीचा भार
आपणच द्यावा
: कफनीसहित..................

•

१६

पळसाची लालसर जांभळी पानं
वरचेवर झडतायत
प्लासीच्या युद्धभूमीवरल्यासारखी
तशा तुझ्या आठवणी मिनू
आठवणींचे थवे
बरंच काही नवं . . . सांगण्याला
आभाळातून चांदण्या तुटतायत
अल्लाद आपल्या सारख्या............

●

१७

मेघमल्हार राग आळवून आळवून
सतेज मेघघन
बरसतात पापण्यांवर
आता पक्षी घरटी सांभाळून ठेवतायत
पावसात . . . शेणाची . . . मेणाची
राग आळवलाच जातो
आळवलाच जातो
आणि मेघ सरकतात
पापण्यांवरून आत आत
तेव्हा आर्तता घुमत असते..............

•

१८

मी उभा ह्या गर्द आंबराईत
एकाकी एकटाच
माझ्या बाजूस गर्द झाडी
आतून पोखरत चाललेली
झाडीत सर्वत्र स्तब्ध . . , नि:स्तब्धता . . .
पाषाण शिल्प : मला जवळची वाटणारी
मी ?
एक पाषाणशिल्पच स्थितप्रज्ञ......

●

१९

अर्ध्या रात्री
अर्ध्यावरती
काही चिंब भिजलेले पक्षी
काठावर
–हृदयाच्या आत आत
कोरत जातायत काळोखनक्षी……
स्वप्नाच्या देठावरून

प्रेयसीच्या ओठांवरून
रक्ताचे डाग
आत आत पाहताना
आपणच विझवावी
आपलीच आग…………

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

पक्ष्यांच्या पंखात
अधून मधून
स्वप्नांची बरसात
अंगात असावं त्यांच्या
नखासकट त्राण
आभाळ भरून येतेय दुथडी
अन् सपवला जातोय स्वप्नांचा पालाण......

स्वप्नांचा शामियाना
रचता रचता
आत खचतो
आत आत इतका की
अंधारातला एकाकी गळा
अथांग दुःखाचा गर्भ
साहवला नाही
तर आपणच कापाव्यात आपल्याच मुळ्या

गर्द आंबराई
आंबराईत पसरलेली पाषाणशिल्पं
पाहाता पाहाता येतो
अश्रूंचा पूर
जीवन असंच जगावं भणंगासारखं
काळोखातून
ऐकायला येतायत बिस्मिल्लाखाँच्या शहनाईचे सूर......

[library stamp, illegible]

२०

इथलं प्रत्येक घर हवाबंद बुचाच्या बॉटलसारखं
आणि माणसं पहुडतात. . . हसतात
झोंबत राहातात : कॅपिटलशी
बंद बुचाच्या बॉटलमधील केमिकलससारखी
यथेच्छ तत्त्वांच्या मारझोडी गप्पा मारतामारता
इथली माणसं उकरायला लागतात
प्राण्यांची हाडं जमीनीतून
आणि पांगवत राहातात रक्तारक्तातून
: रिव्होल्यूशनचा नारा देत
इथली माणसं रिपिटेशन करतात
लुईपत्नी मारीसारखं. . .चटणीचा अर्थ न समजता
आणि कोमेजून टाकतात नवी नवी पाळंमुळं
: रिव्होल्यूशनचं भिंग धरून

ही तत्त्वांची झोंबाझोंबी कधी कुठं काय केव्हा
लक्षातच येत नाही
आणि हळूहळू हाकलून लावतात
इथली माणसं टीपॉयवरच्या फ्लॉवरपॉटला.
इथली माणसं झुलायला लागतात हळूहळू
(. . . की झुकायला लागतात. . . ? )
मोठ्यामोठ्या दगडांसमोर तथास्तूच्या ध्येयासाठी
आणि थुंकतात झाडाझाडांवर : थुंकदाणी समजून
इथली माणसं उन्मत्त मदोन्मत्त होतात
जाग्रण करणाऱ्या कामगारांच्या लाल डोळ्यांवर चर्चा करून
आणि फाडून टाकतात
: चांदण्याच्या आभाळाला. . .
तेव्हा झिंगत राहातो आसमंत पुरा पुरा एकाकी
पहाटे चारच्या सुमारास
आणि पांगतात इथली माणसं
मध संपल्यानंतर मधमाशा पांगाव्यात तशी
तत्त्वज्ञान सांगण्यासाठी दुसऱ्या दिवशी. . .

●

२१

माझ्या स्वप्नांचे मनोरे
असेच केले जाणार असतील उध्वस्त
तर. . .मिनू
तू आता काढून ठेवायला हव्यात
तुझ्या हातातील बांगडचा. . .

•

२२

आता कुठवर सरकणार आहेत
हे तांडं अव्यक्त मनाचे
माझ्या स्वप्नांच्या मनोऱ्याहून
.........पण......... ?
आता जन्नत होणं थांबतंय
.....................
सॉक्रेटिसच्या पेल्यातील
अणू अणू
मला माझे वाटतायत आज
(...... इतक्या उदास दिवसानंतर......)
..........................................
भग्न अवशेष भटकतायत
रुग्णांच्या खाटेवरून............ ?
●

## २३

प्रत्येक मध्यरात्रीनंतर मला ऐकायला येतात
माझ्या पश्चात्तापाचे हुंकार
इथं विदीर्ण पसरलेल्या संस्कृतीनं······मानवानं······
मला काय दिलं ?
(की मला काही घेताच आलं नाही ·····? )

माझ्यासाठी टांगून ठेवलेत आता दारादारावर
मरणाचे शिक्के . . . आणि ओसंडतायत पानापानातून आसवं दु:खाची
मी उसवत जातोय आत आत
काजळी लागलेल्या कणसासारखं······निसवत
(······की स्वत:लाच फसवत······? )

ह्या समूहव्यूहात कॅटेकोंब्सपेक्षा वेगळं काय ?
सगळं काय ?
ह्या हुंकार अव्यक्त रात्री
काहीच कसं उमजत नाही
(······की आता काही समजतच नाही······? )

•

२४

इथल्या घनगर्द निळाईत आंबराईच्या
एक एक शुष्क प्राणी कोजेमलेले……
पांगवतांना जत्थे सहीसलामत जीवनाच्या ऊर्ध्वगामी श्वापदांना
कळस मोहरतो पानापानांच्या डोहातून
आणि मी मात्र बहकत जातोय जिंदगीवर बेदाग टाकताना……
हरेक कडा कडाडत जातो जन्नत होण्याऐवजी
मी पांगत जातोय ह्या मोहोळातून
आणि कुस्करला जातोय : शहेनशाही मंझिलीत
…… तेव्हा पक्षी सुद्धा पाहात नाहीत
ह्या घनगर्द निळाईतील……

●

२५

मऊशार काळ्या कुळकुळीत केसांवरून
अल्गद बोटं फिरावीत सतारीसारखी
तसं ह्यांचं त्यांचं
आणि नजाणो की काय
सगळ्यांचंच वागणं व्हिम्जिकल
कळतच नाही अखेर
संबंध कोणाबरोबर प्रस्थापित करावेत
: ह्या प्रस्थापितांच्या दुनियेत……
हरेक गळफास जरी कण लखडलेल्या चांदण्या रात्रीसारखा
आणि मी … ?
अर्धवट स्वप्नात पाहातोय
अर्ध्या स्वप्नात उठून चालतानाचं चालणं थबकताना
: व्हॅन गॉखच्या पेंटिंग मध्ये
आता मी वरचेवर सांभाळत चाललोय
गच्च धरून माझ्या पांढरपेशी चतुर्थ श्रेणी मेंदूला
…… नजाणो अल्वार विभोर पापण्यांवरून
फुलपाखरं उडावीत
तशी माणसं उडतायत नजरेतून
कालचीच साधी साधी म्हणवणारी
…… प्रस्थापितांच्या देशात …… ?
मी भरचौकात उभा
" व्हॅन गॉखचा कापलेला कान परत मिळेल काहो ऽऽऽऽ……"

●

२६

ह्या घनगर्द शुष्क रात्री कुठले आवाज कॅच करावेत ?
आपले म्हणून पक्ष्यांचे . . . किनखापी हृदयनक्षीवर
आसूड उमटवून जाणारा हरेक जल्लोष कुठवर साहावा ?
कुठलंच हृदय हेलावत नाही आता : भूकंपासारखं
आता फक्त मूकयात्रा साहत राहायची
अंड्याच्या बलकातून . . . इतस्तत : जिवंत प्रेतासारखी
कृश अस्थिपंजर हातातून झेपावणारी सूर्यकिरणं
इतस्ततःच पांगतात ढेकळातून
स्वतःच्या प्रेतयात्रेला स्वतःच हात लावावं तसं
आणि मी बहकत जातोय व्हिम्जिकल दुनियेला गिल्टी होतांना पाहून . . .
इथली हरेक रात्र
काळोख कभिन्न डोंगरमाथ्यावर लुप्त होऊ लागते आत . . . आत......
तेव्हा पेटून उठतो अखंड आसमंत : कर्णाच्या रक्तासारखा
आणि न जाणो की काय
अपेक्षा वाढतच जातात भविष्यात गोष्टीच्या
यशापयशी कुंटणखान्यातून मी माझ्याकडं त्रयस्थ पाहाताना ......
रात्र परतते उध्वस्त स्वप्नांच्या तांड्यासहित
तेव्हा काना न् कोपरा इतस्ततः विखुरलेला
षौड मधुबन गर्द मेघांसारखा ......
नाव वल्हवताना मनाच्या काळवंडलेल्या काजळीतून
कशी काबूत ठेवावीत
...... इथली शागीर्द मनं ...... ?

●

२७

आरसपानी बिलोरी झुंबरातून रक्ताच्या उध्वस्त
मी मला शोधतोय मिनू ह्या व्याकूळ रात्री
इथलं अस्तित्वहीन जिणं नकोसं झालंय
तुझ्या कळकट भांड्यासारखं
मिनू फुलवंती लाजवंती...
कुठलीच वंती तू नाहीस
..............................
तुझं अस्तित्व मजसकट हाडुकासारखं प्रिय
तू आतआत अशी का झिरपतेस ?
..... का ? ...... विखरत जातेस
मजसकट प्रिय
....................................
तुझ्या हुंकारांना साथ देता देता
मी पाहिलंय मला स्थितप्रज्ञ होताना
तू तरी होऊ नको प्रिय
: मजसाठी......?
शोध तुला माझ्यातून
...... आतून ...... आतून ......
माझ्या हरवलेल्या स्वप्नांसाठी
...... ह्या उत्तान भूमीसाठी......

●

२८

ह्या पावसात मी पाहातोय माझं प्रतिबिंब
कुठं दडलंय का ? झाडांच्या पानात
आसवं गाळणाऱ्या . . . मुकपणे . . .
झाडांच्या पानांवरून
पाणी टपकतंय ?
कोण म्हणतं ?
मी म्हणतोय
आसवं गाळतायत आपल्याच चुकलेल्या गणितांसाठी……
शेवाळलेल्या झऱ्यावर
एकच पाखरू नितळतं
आतल्या आत
: वितळतं
झऱ्याचं पाणी
पंखात मुरतं
एकच पाखरू झुरतं
: झुरत राहातं जन्मभर………………

●

२९

ओळखायची असतात कोडी
तेव्हा शेंड्यांसकट तुटत जातात स्वप्नं
...... कुठला काफिला माझा ......
...............
कधी आपण भेटलो ?
आठवतंय मिनू तुला ?
... कारणं कारणं गोळा होतायत
पक्ष्यांच्या किलबिलाटासारखी माझ्या डोक्यात
अनंत प्रश्नांचा जत्था
फक्त तू ?
तूच का ?
. . . काल रात्री
गालीबचं प्रेत स्वप्नात आलं ......

•

३०

आता स्वप्नं रंगवूच नयेत
हरेक स्वप्न होतंय
मेणबत्त्या येशूच्या क्रूसासमोरील ......
कुठून तरी आर्त स्वर . . . का माझ्यातूनच ?
झिरपणारे आतल्या आत आज व्यक्त होतायत
. . . कितीतरी काळोख दिवसानंतर ......
एकदमच मी प्रवाहाबाहेर फेकला जातोय
. . . कुठल्या प्रवाहव्यूहात वावरतोय मी ?
कपट-प्रक्षोभक जमाव माझ्या प्रेताभोवती
: कफनीसाठी
आता तर सुरुवात झालीय
खरी मैदानाची ............

●

३१

अस्वस्थ अशांत उदास......उदास......
पाहातो केव्हातरी आकाशाकडं स्वच्छंद
आकाश स्वच्छ निरभ्र : माझ्या खोलीच्या छतासारखं
अगदी चौरसाकृती : जणू ऐतिहासिक पराभवाचे झेंडेच......
... स्वीकारावं तेही बेहोषांनी. . . ?
नसता चालू राहील अधःपतन असंच
...........................................
किमान कविता तरी सुटू नयेत हातच्या
स्वप्नांसारखं
स्वप्नही असं ?
(गाफिल कसं ?............)

•

३२

समुच्चय गर्भ काळोखात काळोखे पिळोखे देणारे अजस्त्र हात
पारंब्यांशी लगडू पाहातायत आज
रात्र अशी ? उसंत कशी ?
......इतक्या दिवसानंतर पराभवाची उदासीनता
झिणझिण्या आणत जातेय देहभर......
जीवनभर मिळत गेल्या नुस्त्याच आणाभाका
......स्वप्नांचे काफिले जोजवता जोजवता
अंगभर सांडत गेलं अधोगामी वीर्य
आणि
मंझिलीच्या अलीकडंच भेटत गेले
शब्दांच्या औलादीवर पोसलेले द्रोणाचार्य......
ह्यांच्या बेइमानीचे पक्षी
असेच विरहत असतील आकाशात स्वच्छंद
तर खुशाल विहरू देत...
मीसुद्धा बंद केलीयत तोंडं माझ्यासाठी रडणाऱ्यांची
आणि मुक्त केलीत मनश्चक्षूतील आत आत विव्हळणारे रावे
आता फक्त शोधत जायचीत हद्दपार झालेल्या रामशास्त्र्यांची गांवे....

●

३३

बाजारू हसू आणून
गिर्रेबाज तुरे लावणाऱ्यांच्या गळ्यात
नजाकतीसाठी पेश होणाऱ्या हारात
गुंतलेले हात
माझ्या जीवनमरणाच्या प्रश्नात
हात घालू पाहात नाहीत
यापेक्षा
दुःख वेगळं असतं का ?
.............................
ह्या षंढांना खिडकीतून दिसणाऱ्या
चंद्राची किंमत भाकरीपेक्षा कमी वाटते......

●

३४

कुण्या अनावृत्त डोहावरती
घनव्याकूळ भिजलीं गंगा
मी असा एकटा एकाकी
ते प्रेत कुणाचं सांगा. . . ?

अस्पष्ट भाववलयाच्या
तुटता तुटल्या तारा
कवडसा निसटला एक
अन् झिरपत गेल्या गारा. . .

शब्दांची पखरण कसली ?
हा सूर्य उमटला भाळी
डोहात पाखरू भिजलं
अन निथळत गेल्या ओळी. . .

दूरस्थ किनाऱ्यावरती
भयगर्द वाहतो ओढा
रडताना पानं इथली
सुटला अश्वमेधी घोडा. . .

सुरुवात कुठून कसली ?
तिथेच संपत गेल्या वाटा
आयुष्य अर्ध्यावरती
अन् हा सलत राहिला काटा...

●

३५

गवताचं पातं काय ?
रक्ताचं नातं काय ?
पावसातच फुलणारी
फुलता फुलता झुलणारी
वाऱ्याच्या झुळुकेसरशी
: निघून जाणारी......

पावसाचं पाणी
चिंब चिंब आलं
डोकं अवघं ओलं
डोक्यावरचं पाणी
डोळ्यात आलं
आतल्या आतच
: थिजून गेलं......

पावसातल्या जखमा
खोल खोल गेल्या
कुणासाठी......कशासाठी ... ?
एकटंच आभाळ
धाय मोकलून रडतं
संपून गेलेल्या
: ओढ्याकाठी ......

•

३६

आकाशाला टांगलेल्या दोरात गुंतलेले हात
आणि पायाखालील सरकणाऱ्या वाळूवरील अधांतरी लटकणारा
: आपला देह

आता झोकांड्या खातोय ... पतंगासारख्या तुटलेल्या. . .
प्रेक्षकांतून हसताहेत माकडं आपल्या विकलांग मन:स्थितीला
हळूहळू जमा करतायत प्रेतं सापळ्यांची जल्लोषात
दोराला भार होवून तुटेल दोर ... किंवा साहवणार नाही
वाळूला आपला भार
सांगता येत नाहीत शाश्वताची विधानं एकलव्याला
...... सांगता येणार नाहीत द्रोणाचार्यांच्या डोळ्यातील भाव......

मनाला बोचत गेलेली शल्यं उलगडत जातायत
झाडांच्या मुळांपासून शेंड्यापर्यंत
पानं नुस्तीच हात फिरवून घेतायत रित्या हवेत
कानांच्या संवेदना बोथट होतायत ...... बोथट होतायत
काही आठवणीचे तीक्ष्ण स्वर ... मिनू ... ?
धप्पकन कोसळलेल्या घनाघाती जीवनातून
संपवनही घेता येत नाही स्वत:ला ... धागे नुस्तेच ताणत राहातात
आशांचे...... आठवणीचे ...... भूमिका पडलेल्या नटाचे नष्टचर्य संपावे
आणि टाकावेत लांबून पडदे व्यासपीठावरचे
: तसेच सर्व ...... सर्व सर्व तसेच ......

●

## ३७

दु:खात आवळले जातात काही क्षण
एकदमच थांबलेल्या भूकंपासारखे
शांत शांत उदास अश्रूंचे थेंब अडखळतात
डोळयाच्या उंबरठयावर कसे केले गेले असतील उत्पात ?
झाडांच्या मुळामुळांनी शोषून घेतले असतील : काळाचे ओघ
......क्षणभंगुर आलाप मिटत मिटत जातात
: पापण्यांच्या आत खोलवर......
आंजारीत गोंजारीत जातात दु:ख हलवत जातात मुळांसकट
पापण्यांवर किती काळापासून थांबलेलं दव थांबतच राहिले
कविताही लिहिल्याच गेल्या : आषाढ घनासारख्या
......तसे काळोखही दाटतच आले आभाळांसहित......
तांडेच्या तांडे उध्वस्त होत गेले......बंजाऱ्यांची गीतं नाहीशी झाली
झाडांचा बहर नाहीसा झाला......नाहीशा झाल्या आता
: काही आठवणी......
किती किती होत आले द्रोणाचार्य नि एकलव्य हरळीसारखे
इतिहासाची पानं रंगत राहिली सुवर्णाक्षरात
रंगत राहिल्या जित्या जिवाच्या आकांक्षा
: विहंगम दृश्यांसारख्या......

सापडत गेल्या काही वाटा लाटांना कवेत घेताना
तुटत राहिले अंगठे तरीही सांभाळावीच लागली स्वप्नं……
आईचा फाटलेला पदर जोडू म्हणता म्हणता
साचत गेले आतवर कितीतरी शोषितांचे अस्वस्थ हुंकार
……उसवत गेले अभ्रे तरीही पाहावंच लागलं बगळ्यांकडं
: कित्तीकित्ती शुभ्र म्हणून
……सृजनाचा मेंदू का कुठं संपवता येतो ?
का संपवता येतात कुठं आपणच तयार केलेले
: गुलछबू कठडे……?
ह्या विहाराची भाषा अशीच चालू राहिली
चालू राहिल्या काही संबंधांच्या वाटा गोटातून . , . तबेल्यातून
उध्वस्त होत गेली काही गाणी . . . . . .
काही तंतू सिंहाच्या आयाळीतले
घायाळ होत गेले शागीर्द… बेसूर तालातली मनं सांभाळतांना……
…… सोडावाच लागेल बाण आता……
छेदायचे आहेत संस्कृतीनं बांधलेले जात्यंध मासे
थांबवायचे असतील उसासे तर ओढावा लागेल दोर
मागे जाईपर्यंत : रसातळा पर्यंत सुद्धा……
तेव्हाच कुठं दाबलेली हवा जोमानं वर येण्याची शक्यता
डावलता येत नाही . . . डावलता येणार नाहीत नियम निसर्गाचे……

●

## ३८

एका उंच अर्धवट कललेल्या कड्यावरून खाली पाहातोय
अगदी खोल खोल काळोखगर्भ दरीत
प्रचंड आवाज माझ्या माणसांचे : मेटचा मारून गुडघ्यांचे
काळाच्या ओघात दडलेले …… कॅटेकोंबससारखे
मी असा ? निष्काम कसा ?
त्यांचा आवाज माझ्यापर्यंत पोहोचत नसेल
किंवा त्यांच्याजवळ तरी मला जाता येत नसेल कशावरून ?
…… मी ऐकतोय आता काळाच्या गर्भातून
अभिमन्यूचे स्वर ……
…… खांद्यावरची फुलपाखरं उडूउडू पाहाताहेत
पारवे आत आत लुप्त होताहेत……डहाळीत……उत्थानगुंफा…… ?
आणि मी ? स्थितप्रज्ञ……चेहरा हरवलेल्या बंजाऱ्यांसारखा……

किमान आज तरी रोखता येणार नाही अध:पतन चहूबाजूंचं
……कितीकिती करत जावं उत्खनन भूतकाळाचं
तितकीच सापडत जातील उध्वस्तांची चिन्हं
कोणाला ओळखता येतात पिळवटून निघालेले पराभवाचे स्वर……
की कोणाला शोधता सापडेल ?
…… माझ्या उध्वस्त स्वप्नांचे समस्त तांडे………
कुठलेच कंगोरे पूर्ण बांधून होत नाहीत
खचत जातात आत आत कितीतरी भिंती……शब्द-लाळेत……
……………………………
हे ज्ञानेश्वरा तू भिंतीवर ?…… वाळीतच रे अजून …… ?

●

३९

असेल सूर्य माथ्यावर तळपता त्रिकालासाठी
तर त्यानं कृपया खाली यावं
पसरलेत पदर चौफेर इथल्या दारिद्र्याचानं ......
ओढघशी करता करता तर कुठं मैफिलीला रंग चढतो
शुष्क...... असे उदास उदास ...... पिंपळाचानं टाळ्या वाजवत
राहातात

असेल निळ्या आकाशात झोकुनचा तुटलेला शुक्रतारा
तर त्यानंही कृपया खाली यावं अभिवचनासहित
...... आमचं फाटलेलं आभाळ सांधण्यासाठी......
घोड्यांच्या टाचेची नाल थोडी सैल करण्यासाठी......

●

४०

**खिडक्या बंद करून झोपलेल्या घरांची कविता**

खिडक्या हळूहळू बंद होतात तेव्हा तावदानं बाहेरच असतात
एक नाजूक हात बांगडयात किणकिणणारा हळूच बाहेर सरसावतो
आणि बाहेर आलेल्या मनीप्लँटचं डोकं हळूच आत ओढून घेतो
बाहेर काजवे चमकत असतात... त्यांच्या डोळयात धूर गेलेला असतो
घरातले कप्पे उलगडत उलगडत जातात तेव्हा
आकाशातला चंद्र घरात डोकावतांना दिसतो......
वाऱ्याच्या भणाण निनादात घरातील कर्टन्स थोडे हलतात
लाजतात ... बुजतात ... पायातले पैंजण हळूहळू वाजवतात
आतले श्वास सर्व आतच असतात ...
फक्त बाहेरचे श्वास तेवढेच आत येऊ पाहातात
तेव्हा अंगणातली बोगनवेल तुळशीशी संभोग घेते
आणि कर्टन्सच्या हेलकाव्यानं फुलदाणीतली फुलं
उमरखय्यामच्या रुबाबात जातात......

दुपारच्या टळटळीत उन्हाचा प्रभाव जसा पडत नाही
दुपारी फ्रीजवर : तसाच रात्रीही : बर्फ थंड गोठलेले आतल्या आत
चिमण्यांची चिव्‌चिव्…कावळ्यांची काव्‌काव्‌ ऐकू येत नाही
तावदानातून आत त्यांना
"ये ऽऽ चंद्र बघ ना रे…कित्तीकित्ती गो ऽऽ ड नाही का?"
तो निद्रेत निद्राधीन…ती निद्राधीनतेत व्याकूळ
तिच्या पापण्यांवरची आकाशपेलणी डोकावत डोकावत
अहिल्येच्या शेजारी……अंगणात जाते……

निसर्गाची निर्मिती थांबवणारा फ्रायपॅन कुकिंग रूममध्ये
केविलवाणा बसतो : चाचपडतो अंधारात…काही किण्‌किण्‌ते आत
जगदंबेचे डोळे सर्वत्र फिरतात घरात...चंडिकेसारखे
……बाहेर स्वच्छ फरशीचं अंगण……
सृजनाच्या कवितेतला विनाजळातला भक्कास औदुंबर
घराकड पाहून अगदी भकास हसतो
तेव्हा दूरच्या केव्हज्‌मधील दोन डोळ्यांचा जागर
जागताना दिसतो …. अर्ध्या रात्री
……………………………………………………
(त्याच्या डोळ्यात काजव्यांचा बहर उतू जातोय……?)

●

४१

गच्च हिरव्या बांगड्या भरलेल्या वडाच्या झाडावर
कावळा……काळा……त्याचा कर्कश आवाज पेंगुळलेला
उदास उदास आकाशात डाग मिरवतानाचा चंद्र
आणि फुलपाखराच्या मागं लागलेला पतंगाचा तुटलेला देह
अंतर मोठ्ठं अवकाशात……आकाशात……पृथ्वीत
त्याच्या आत झाडांचे हात…… हवेवर हेलकावणारे अनंत
…… दुपारच्या न आठवणाऱ्या स्वप्नांसारखी मिनू……
बॉबकटसहित तिचा अर्धा देह बाहेर गॅलरीतून
नर्गिसच्या शेरवानीतली नजाकत ॲशट्रेतल्या
अर्धवट विझलेल्या सिगारेटच्या तुकड्यातून
तो हिंदकळत जातोय पेल्यातील कमनीय बाहूतून
…… समुद्रात हेलकावणाऱ्या श्रांत तिच्या करंगळीचा
नाजूक तानपुरा : पायात काळाचे ओझे लिलावासारखा तो
त्याच्या डोळ्यात निर्जीव पाखरांचा थवा……
……मीनाकुमारीची उसवलेली जर…… नि हस्तलिखितं ……
त्याच्यातून : त्याच्या टेबलावर : इतस्तत: विखुरलेली……
………………………………
आता तो : मीनाकुमारीच्या बाजूस उभा : लिलावासाठी ……

●

४२

श्रमिकांच्या घामातून प्रेमाला उधाण आलं : ताजमहाल
नंतर तरंगत गेले हाडांचे सापळे यमुनेच्या श्रांत डोहात
कुजले असतील का नसतील ? की घेत असतील आनंद
खोपड्या टेकवून काठावर : निर्मिलेल्या निर्मितीचा ?
चांदण्या पंख पसरून बसलेल्या चांदण्या रात्री
दोन्ही काठावर : फुलांवर टेकवावा बहर फुलपाखरांनी
. . . शिडीवर झपाझप पावले उचलताना पडलेल्या
अन् समोर सगळा शब्दबंबाळ ओळींचा जत्था सुवर्णपानांवर
" अपने प्यारके खातिर शहेनशाह शहाजहानने
मुमताज बेगम के लिये बनायी हुयी तस्वीर......

•

४३

असून आपलेच ते आपले नसल्यासारखे वागतात : खुनशी
तेव्हा त्यांच्या बंगल्यातील गर्भरेशमी चाली आपल्याला सुन्यासुन्या
वाटतात
अस्पर्श्य अनुत्साही . . . जमिनी मला आत घे . . . आत घे . . .
जन्मदात्री तू मला पुन्हा मिटवून घे तुझ्या गर्भात मला साहवेना ग ! !
. . . साहवेना हा एकान्त उदास . . . मी सज्ज भग्न अवशेष नग्न ग . . .
पाहावेनात ह्यांच्या शब्दांना डौल कासवाच्या कवचाचा जाड कणखर
मिटेना . . . फिटेना . . . रुचेना सूचेना . . . सर्व काही सुनंसुनं
पाखरांच्या पंखांचं वस्त्र आता अनवाणी
आर्त असा पराभव : मोरांच्या दुःखाचा टाहो कुठं उरेना
दोन कॅनव्हास जोडले तरी आता अवकाशच पुरेना . . .

●

४४

उडणारे पंख कापून टाकल्यावर रक्ताचं थारोळं साचलं
दगडांवर……आणि मिनू आता कुठं आठवण तुला पाखरांची
झिम्मड झिम्मड झाल्यावरती पारवे उडालेत आता
……त्यांच्या पान खाऊन रंगलेल्या चोचीसहित
करता आलं तर एवढं करून पाहायला हरकत नाही
अस्तरं सगळी एका बाजूला जमवून ठेव……सुचतील ?
. . . हौदातल्या पाण्यात थोडं प्रतिबिंब पहा तुझं निळ्याशार
आणि हुल्लडबाजी कर रवींद्रनाथांच्या चित्रांशी
मग ! बघ जमून जाईल सर्व काही : जमलंच तर……

ह्या किनाऱ्यावरून दिलेला आवाज त्या किनाऱ्यावर
पोहोचत नसेल तर ……मूल्यं अशीच राहू द्या
पिंपळपानाच्या टाळ्यात……पाखरांच्या गलक्यात
आता मी माझी शाळा सुरू केलीय…………
बिछाना…छान गालीचा सर्व काही हात पसरलेल्या घरांसमोरच्या
दोन्ही ओटयांवरच……जमलंच कधी काळी माझ्या सापळ्याचं
ओसरीवरचं प्रेत वाहायला पाठवता आलीच चार माणसं
तर तुमच्या किनाऱ्यावरून पाठवा……सापळ्यासाठी
……अगदी जमलीच तर लाल कफनी पाठवा……
दूऽऽरच्या डोंगराला इंद्रधनुष्य टेकवा : जमलंच तर……

●

४५

पडद्याच्या आतून अशी बाहेर ये ... अजून बाहेर
माझ्या शरीराचं विच्छेदन चाललंय सहस्त्र बाणांनी
असेल वेळ तर न्याहाळता येतील तुला माझ्या
रक्तारक्तातील स्वप्नांचे कोंभ ... अब्लखवारू ?
पाखरांचे जत्थेच्या जत्थे निथळत पाण्यात ढगांच्या
मला माझ्या बोटांच्या स्नायूंना आवरणं कठीण असं ...
.... केळीचे कोंभ उलगडतायत अर्ध्यारात्रीं ...
मी पक्ष्यांच्या पंखांचे चाळ पायी बांधून
यमुना पर्यटनाला निघालोय ... असतील शक्य तर
तुझ्या घोड्याघोड्याखालचा बाण व्यवस्थित लाव
मी येईपर्यंत .... गाठोडं तेवढं टेकवू का ?
माशांच्या डोळ्यात आकाशाचं प्रतिबिंब पाहायला
निघालोय मी ... माझं साळीचं वन तेवढं सांभाळ
... मी यमुना पर्यटनाहून येईपर्यंत...

मिनू . . . , तू अशी सांभाळ तुझे पंख, बिलोरी स्वप्नं
तू स्वप्नांत ठेवलंयस म्हणे एक स्वच्छ पांढरं कबूतर
त्याच्या पंखांवरून तू हात फिरवतेस . . . कुत्रा पाळलास ?
मग मी तरी काय संदर्भहीन तुझ्या समईजवळ
संदर्भ : गच्च ओल्या हातांचे
संदर्भ : तानपुरा हरवून हवेत हेलावणाऱ्या स्वरांचे
संदर्भ : असेल कोणी राधा . . . पारु पदरात दडलेली
मी माझ्या आठवणीसहित येतो आहे अशात
दुपारी शेतकरी बैलांना पाणी पाजायला ओढयावर हाकावेत तसे . . .
ओढयाचं शांत नितळ पाणी . . . त्यात तुझं घर
घराला खिडक्या दरवाजे वगैरे वगैरे . . .
दरवाजाच्या बाहेर तू एक पात्र ठेवलंयस दुपारी सूर्यग्रहण पाहाण्यासाठी
त्या गोल पात्रात मी निळं निळं स्वच्छ निरभ्र आकाश पाहातोय . . .
मिनू ? . . . मी व्यासाकडे सरकणारा
दुपारी आकाशात लटकवलेला उध्वस्त सूर्य . . .

•

४६

गोल गोल खोल खोल ... सरडेच सरडे सर्व झाडांवर
... आत ... आत ... मुंग्यांच्या वारूळात ... पुस्तकांच्या ओळीत
झिंगत जात पानांचे बहर बहर आळसावलेले ... हिमनग !
... वोडग्याची चव जिभेवर ... काळजातला दोर ओढत ओढत
कम्सामोलकडं ...
तुझ्या हातून फुललेल्या साळींच्या फुलोऱ्याचा बहर
पोटऱ्यात आलेली ज्वारी ... पदराचा सोगा कंबरेला खोवून
... ये माझ्या राजा ... पक्ष्यांना हाक म्हणालीस कणसांवरून ...
आजूबाजूचा सगळा षंढ वारा ... पक्षी जाय दिगंतरा
नातासुना ग कोणाच्या ... चिमण्या चालल्या उन्हाच्या
: तू जात्यावर ...
पक्षी उडाले उडाले पुस्तकांच्या ओळीत ... चघळून टाकलेल्या
चिपाडांसारखे शब्द शोधत ... पोरींच्या चोळीतून
माझे आई ... घाऱ्याघाऱ्या डोळयांची ... कृश कृश बांध्याची
नजर दू ऽऽ र वर ठेवून हातातल्या गोफणीची
..................................................
तुझी हाळी येतेय ग मला श्रावणकावडीवरून दिलेली ...

●

४७

हळू हळू पुसट होत जाणारं धुकं..................
श्रमसाफल्याच्या क्षणांना जोपासणारी कुमारी माता
गद्‌गदत जाते अंगोपांगातून सहस्त्र वेदनांनी
...... फुलून निघतात तिच्या हर्षोन्मादातील कोमल ऋषभ......
पिंपळपानावरच्या कावळ्यांच्या ललाटांनी बहरून प्रसवणारा उन्माद
...........टिट्‌वीची टिव्‌टिव................. .....
काळजात रुतत जाते तिच्या खोलखोल
गहिऱ्या आवाजातील कोकीळ............
आतल्या आत फिरणारं गिर्क्या घेणारं बीज
............उद्रेक रहस्यात डुबू पाहाणारं............

●

४८

ताण
भैरवी गाऊन गाऊन
मान टाकलेल्या गायकीचा
ताण
आकाशातील अवकाशाला
हिजड्यांच्या लोंबकळण्याचा
ताण
सत्तांध होऊन दोरा कातणाऱ्या
नाजूक हातांची नखं कापणारा
ताण
शिशिर ऋतूतील सूर हरवलेल्या
पागल झाडांचा.

ताण
रात ढले खिडकी तले
तुम शिट्टी बजाना छोडदो ऽऽऽ
ताण त्याचाही कणभर
वस्त्र फिटेपर्यंत कणसं उगविणाऱ्या
दुःखाचा मणभर : साळवनात
ताण
डोहात घर सोडलेल्या
सैरभैर माश्याचा
ताण
झडूझडू झालेल्या सूर्यदलावर
घिरटया घेणाऱ्या फुलपाखराचा
ताण
बहरलेल्या कॅनव्हासच्या रंगामधील
कावीळ आत जिरवणाऱ्या आकाराचा
ताण :
"धुक्यासारख्या येणाऱ्या पराभवाची जाण..."

●

४९

ह्यांच्या गाभुळलेल्या तुकतुकीत संस्कृतीच्या पालाणाखालून
हळूच मांजरं निघाली आणि फिरत राहिली गावभर
गावभर मांजरं फिरली . . . सगळा गाव अंधारून गेला
. . . अंधारून गेले झाडांचे बुंधे . . .
कळपाकळपाने तांडे पसरत गेले आदिवासींचे
डोळे विकत गेले
विकत गेले भावनेचा ओघ
. . . झंझावाती वादळातल्या मिणमिणत्या दिव्यासारखे . . .
त्यांच्या ओठांवरचे शब्दं ओठांवरच मेले
आणि............
आणि मांजरं माकडं बनून गावभर धिंगाणा घालत गेली......

●

५०

आता
आपादमस्तकातून स्वप्नं बरसवीत जाणारी : कुमारीमाता
दायांच्या हातातील तृणाच्या गाठी आणि वादळाला पाहाणारा
खिडकीतला मिणमिणता दिवा..................
............बीज............तृणा...................
वेदनाच वेदना सर्व अंगभर प्रसूतीच्या
कुमारी मातेचे डोळे : अर्धनग्न............
पक्षांच्या गळणाऱ्या पिसागत प्रत्येक कौमार्याचे भाव उलगडतायत
............पाकळी पाकळीतून............
आणि आता
तिच्या काळजाचे रंग तडकतायत
भयग्रस्त आकाशाच्या पोटात......मिण्मिणत्या दिव्याच्या कडा
झरोक्यातून टाकतायत कवडसे............
तिच्या उभारभार गर्भ देहावर............
ती तुटत आहे............ती सुटत आहे अभ्र्यातून......
...............................................................
इतिहास गद्दारी करतोय रे कर्णा आता तुझ्याशी...........

•

५१

जमिनीतून उगवणाऱ्या गर्भरेशमी झालरीवरून
झिरपत जाणारा कवडसा
आणि तळव्या तळव्यांनी झाकला जात असलेला
अर्धांग वायूच्या झटक्यातला सूर्य
......सर्व अधोगामी............
ठिबक्या ठिबक्यांनी सापांचा गलका
मधोमध समाधिस्थ प्राण आयुष्याच्या धाग्यात
गुंतलेले चवीचे ओठ.......................
आतून भ्रमिष्ट भ्रामक कल्पनांचा तवंग
तरंग दुधावरच्या धारोष्णातील सायीचा थर
आयुष्याची तुटक रेषा मधोमध
विकल्प विखारांचा गलका
आणि
टाचांची कातडी कुरतडणारं अस्वल
वज्रहस्ती...........स्वप्नदंती...........
आता
बुरखा सवंग आकाशातील तारकांना
............................................
पादचारींचा घोळका सर्व बाजूंनी.........आतून बाहेरून
ढगळ झगा झालरीचा
माद......उन्माद......जल्लोष............
तत्त्वांची पानं स्वत्वाच्या आत..........

•

५२

का फुटावा कंठ इथल्या अस्वस्थ श्वापद मनांना ?
की का हलत राहावीत शिशिर ऋतूतील चुकार पानं ?
काही गाणी काही तराणे विरून जावेत आभाळात
सूर्याच्या प्रखरतेत किरणं कोमेजून उभी राहावीत तशी……
आकंठ स्नान रक्ताचा ह्या तानाशाहीत
अंग सारं ठणकतं वेदनेनं
तरी रात्रभर कानात घोंघावत राहावीत
जिंदाबादच्या घोषणा………………

खिडक्या खिडक्यातून बसतात माणसं : गिधाडासारखी
कोटया उडवत बसतात प्रश्नांचे भरधाव मिशीला आवळून
……फुलांचे बहरलेले मोसम उध्वस्त झालेले पाहिलेत कधी ह्यांनी…?
चिखलभरल्या आसमंतात झडूझडू पंखात नाचतो मोर
गर्भार अक्षरांचे थवे रडत वितळत जातात काळोखभर……
कबंध तरी असे कसे ? ज्यांच्या पानांनाच खडे
अर्धनग्न डोळयातून वाहात जावीत जिवंत माणसांची हाडं
जिथे काही चांगले जोपासू तिथे सूर्यास्ताची रांग
वादळात कसा ठेवावा दिवा मिणमिणता प्रिय, मिनू तूच सांग……

●

५४

अंगांगातून पेरीत जाते
शब्दकळा कुणी लोरी……कुणी मिनू
पडदा नाटकाचा सरकल्यानंतर वरपर्यंत
प्रेक्षकांच्या डोळ्यात प्रवेश : द्रौपदीचा भार
शिशिर ऋतूतील पानांना
पान पान गळतांना पान
भिंतीला कान
रेड्याच्या तोंडून शब्द वदवण्याचे दिवस
गतकाळ आणि ज्ञातापलीकडं : अज्ञानाचा महामेरू
आडव्या गजांच्या खिडक्यावर लोंबकळणारे
बोंबील मासे……त्यांची छिलून छिलून काढलेली आतडी
रेशमाचा दोरा दोरा पिंजून काढणारे अजस्र हात
नि त्यांची बकाल कंगाल वस्ती
: कुत्र्याच्या केकाटात झोपी जाते……
तिन्ही सिंहाच्या पायाखाली
कागदाचे घोडे भरधाव पळत आहेत
: केविलवाण्या नजरा पार करून……

●

५४

कधी गुलजार……कधी गुलछबू माळून हाताला पारवे
कधी कागदाचे घोडे नाचवताच आले नाहीत
आयुष्यांनी छिलून छिलून घेतलेल्या आपल्या जखमा……
विसरून……दोन हाताला भाकरी मिळावी इतरांनाही
म्हणून कळपातून……झुंडीतून बेहोष नाचत गेलो
अर्ध्या नाचण्यावर समजलं बेंबीचे देठ बदनाम होताहेत……

पांढऱ्या सफेद घरात राहणारे……रोमँटिक पानात
उलगडणार हरेक दिवस …..गुलाबी स्वप्नं जोपासणारी
झूमूर……तू गेलीस कुठल्या विवंचनेत
तुझा अर्धा श्वास अजून आमच्यातच उरलेला
किती काफिले झटले तुझ्यासाठी
तुझ्या मरणोत्तर मुक्तिसंग्रामासाठी
जमाव……बियरबारमध्ये बियरला फेस यावा
तसे जलद वर येतात…… "सेक्युलर" झुंडीच्या झुंडी
……का यांना दिसू नयेत कुण्या अपंगाच्या
घरची सुशीला……कमरेला पदर खोवलेली……?
……आरशात मी पाहतोय मला
कळपातून परतल्यावर
माझ्या भरधाव वाढलेल्या मिशा
कापून घेतल्याचं लक्षात आलं नाही……
……………………………………
अंड्याच्या बलकात घुसळण आत सडते आहे
व्यासपीठामागे अंधारात सुशीला एकटीच रडते आहे……

●

५५

आश्वस्त भूमीतील कोमेजून कोमेजून गेलेल्या कळ्या
पाकळ्यांसाठी गाणं गातात : अस्वस्थ ·····अस्वस्थ
कुण्या घोड्याच्या खिकाळण्याचे आवाज : तू क्यूबा होताना
: माझी हिरोशिमा नागासाकी
वाटून घ्यायचं कसं वाटणाऱ्यानं अलगद पानं
आतून आतून तुटत जाताना शिशिर गावं कसलं गाणं......?
गजांच्या खिडकीतून दिसणारं विटांच्या खालचं
किड्यांचं हृदयरुदन हळव्या हळव्या गायींना
गाय अखेर कसली गाय ?
तिच्या खुरांचे आश्वस्तभूमीत झडून जातायत पाय......

अर्धा श्वास आत अर्धा श्वास बाहेर असलेली
ही कसली अधीरता ? हवेत हात विरून जाणारे
पळसाच्या फुलात......
गंध......सुगंध...... बेहोष झालेली तलवार
......मैफिलीच्या अर्ध्यावरच जगणं सोडून बसलेली माझी सतार......

●

५६

आपुलीच धिंड
काढूनिया काय ?
मन वाळलं तरीही
मेघ बरसून जाय......
मृगजळ माजलं असं
जळ जळानंच प्यावं
अन् तमानं दिठीला
मिठीत घ्यावं
गाऊनी गावं असं
कोणाकोणासाठी गाणं
गाणं गाणाऱ्याचे डोळे
डोळे......केविलवाणे......
जिथे जाऊ तिथे कशी
उध्वस्त शब्दांची आरास
तुझे केस वाऱ्यावर .....मिनू
मन उदास उदास............

५७

**काही अभंग : भंगलेले**

१

आपलीच विष्ठा
आपणच खावी
रात्र सारी गावी
गात्रातुनी
नको झालं आता
भेकडाचं जिणं
जिण्यासाठी उणं
राहिलं काय ?

२

ज्ञानाचं आगर
बांधूनिया पायी
नाचतात गायी
सन्मित्रांच्या
ओळखावं कुणी
नाही भीडभाड
तत्त्वाची ना चाड
अस्मितेला
देव्हाऱ्यापाशी
गुंडाळिला गाशा
झेपावती आशा
झुंबरासाठी
स्वातंत्र्याची वेळ
घालण्याची लूट
सोबत्यांची तूट
न जाणवे अनंता...........

३

गाता गाता गाणी आटतंय पाणी
मनातली वाणी झुरताना
समोर काळोख दुभंगती दिशा
झेपावल्या आशा झुरताना
दुरूनिया हाक टाकतेय कात
दिव्यातली वात विझताना
दाटले आभाळ गर्जुनिया शंख
कपाळाला डंख मारताना
स्मशान समोर खोदलेला खड्डा
सज्जनांचा अड्डा बसलेला

पापण्यांचा पूर चाले दूरदूर
शोधताना घर स्मशानात
ताटवे हासती मनात मनात
विरती क्षणात एकान्ताच्या
एकटं रडतं पिंपळाचं पान
अंगात त्राण नसताना
चावडीची जागा आजूबाजूला पोरी
एक ब्रह्मचारी झोपलेला
ओवाळा ओवाळा हारावर हार
दुभंगेल भार धरणीचा
गाता गाता गाणी डोकावेल कोणी
सोडनी विराणी......अर्ध्यावर......अर्ध्यांवर

४

दूरवर एक चांदण्याचं तळं
नांदती गांडुळं रात्रंदिन
वटवृक्षावरी कावळ्यांची रांग
झिंगलेली भांग मुडद्यांनी
वर्षाकाठी एक पंढरीची वारी
नाचतो डोंबारी आळंदीत
अंधाऱ्या खोलीत विझलेली चूल
बैलावरी झूल पांघरीली
हारावर हार टोप्यांच्या मताने
पडती उताणे खुर्चीवर
पारधी शोधतो पारध्यांचे फास
बेभानले मासे बगळ्यांसाठी
हातावर मूठ मुठीत भराऱ्या
वाजविती टिऱ्या एकमेका......एकमेका......

५

सूर्यास्त मनात टेकडीच्या मागं
एक दिवा जागे दगडांपाशी
गोड गोड बोले दुकानात वाणी
पोटात पाणी घेऊनिया
नसून पाऊस नाचतात मोर
खुर्चीखाली चोर दडलेले
जळताना जाळ अंगी आगआग
भाकरीला डाग पडताना
म्हणे गंगेमध्ये न्हातात घोडे
पाटलांचे वाडे जाळताना......जाळताना......

६

दिवसाच आली
भणाणून रात
दिव्यातली वात
ठरेचना
इथं कुणी तरी
मला माझं वाटे
मनातले काटे
बोचताना
गोधडीच कशी
उसवली बापा ?
नुसत्याच थापा
हिजड्यांच्या
विचारून पाहा
मनातलं कोणी
पाण्याहून पाणी
झालोय मी............

व्हॅन गॉख : एक उत्सव

व्हॅन गॉखच्या डोक्यावर पसरलेली प्रचंड व्यासाची
अस्ताव्यस्त टोपी प्रचंड घेराची
त्यावर अर्धवट विझू विझू पाहाणारी मेणबत्ती
हळू हळू अधिकच पेट घेते......................
बाजूच्या सर्वच मुंग्या वळवळून हळूहळू
मरण पाहाण्यात गुंग होतात..................
तसा व्हॅन गॉख मरतही नाही
त्याच्या भोवतीच्या हवेत सफरचंदाच्या पापुद्रचींचे
प्रचंड वलय अस्ताव्यस्त उडतंय........................
तो निरखून पाहातोय जगापलिकडं असणाऱ्या
पुलावरील एक थाळी.............................
थाळीत केक रंगीबेरंगी......सप्तरंगी त्यातही
एक मेणबत्ती जळतेय
जळणारी मेणबत्ती केकवरून हळूच बाजूला होते
आणि आपल्या प्रचंड टोपीच्या पिल्लेदार
घेऱ्यावरील मेणबत्तीशी स्पर्धा करू पाहाते...........
ती स्वत:ही विझत नाही
व्यासावरील मेणबत्तीलाही विझू देत नाही
ही झोंबाझोंबी पाहाण्यात आता
व्हॅनगॉख इतका तल्लीन होतो की
त्याच्या समोरील आकाशाला कवेत घेणारी
धारदार टोकाची, हिमाच्छादित शुभ्रवलयाला
प्रचंड हसून कवेत घेणारी सुरूची झाडं हळूहळू
त्याच्या नजरेत भरतात............
महापुराच्या भयानक परिस्थितीत विझू विझू
पाहणारं खेडं......खेड्याच्या बाजूनं वाहाणारा
पाण्याचा प्रलय...........भोवरे......भोवरे......
भोवरे स्वत:भोवती फिरणारे......भोवरे
फिरताफिरता सुजाण जिवाणूंना पोटात गडप करणारे

भोवरे.........आता व्हॅनगॉख झिम्मा खेळणाऱ्या भोवऱ्यात
लीनपणे पाहातो............नको वाटतं !
पुन्हा पाहातो......पाहाता पाहाता क्षितिजरेषा त्याच्याकडं
कुत्सितपणे पाहून हसते..................
क्षितिजरेषेच्या पलीकडील जगाच्या गर्भात विव्हळणारी
प्रेतं..................
प्रेतातून व्हॅनगॉख पायीच चालतो............
व्हॅनगॉख पायी चालता चालता हळूच थांबतो
थांबतो न थांबतो तोच मागं वळून पाहाण्याची
अंतर्मनातली प्रचंड काळापासून चालत आलेली
इच्छा......ऊर्मी......तो दाबू शकत नाही......
घसरणाऱ्या आणि स्वतःत लुप्त होऊ पाहाणाऱ्या
वाळूवर तो पंजे उंचावून उभा ठाकतो
कपाळाला आडवा हात लावतो...... त्याच्या हाताच्या
बोटांनी रंग प्यालेला असतो तृप्त......तृप्त......

बोटं न्याहाळीत असतात त्याच्या बुभुळाभोवती पसरलेल्या
कुण्या नाजूक पोरींनी......नाजूक हातांनी आत्ता
निसवलेल्या कणसातील काजळी अलगद काढावी
आणि फासत राहावी नखांनी डोळयाच्या खोबणीत......
डोळयाच्या खोबणीतील वाळवंटातला
पसरत गेलेला पावसानंतरचा उन्हाचा
पट्टा निळयाभोर डोळयातून
सुरूच्या झाडाची गर्द हिरवी पानं
काटेरी तावदानांसहित बाहेर फेकतो
आणि बोटं जाडजूड अस्ताव्यस्त
झोपी जातात क्षितिजरेषेवर......दूरवर......
त्या दूरवर काही पक्षी स्वतःच्या चोचीत
स्वतःचे पंख खुपसून घेतात

गर्भधारणेसाठी.........................
तेव्हा व्हॅन गॉख अर्धवट झोपून
काळोख पितो......मध्यरात्र कुण्या तरी
एका निर्जन बेटावर
हळूहळू रडत असते हमसून............हमसून............

त्याच्या टोपीवरील पल्लेदार खाकी हॅटच्या
घेराला हे बेट दिसतं आणि ती हॅट त्या मेणबत्तीला
हळूहळू सांगते
बेट कसं जळतं आहे ...... अंधारी उन्मत्त रात्र आता
सगळ्याच सुरूच्या झाडांना कशी गिळून टाकते आहे.........
आणि सुरुची झाडंसुद्धा किती
हिमवेदना सहन करतायत आतल्या आत . ....
धुरकट धुरोळा पानांभोवती
मेणबत्ती हळूहळू आत शिरते
आणि चक्क समोरच्या पुलावरील
थाळीतील केकवरील मेणबत्तीला आव्हान देते......
केक वरचेवर रंग बदलतो जसा तो श्रावणातलं
सगळं पाणी स्वतःच्या डोळ्यांनी वाहवलं असतं
टिपूर......टिपूर..................
अर्धवट झोपेतला व्हॅन गॉख दूरवर पाहातो
अगदी दूरवर.......................
त्याला आता वरचेवर माणसांची ॲलर्जी
होते आहे......तो कुठंतरी हळूच हात
फिरवतो तेव्हा त्याच्या लक्षात येतं की
आपल्या सर्वच संवेदना आता अगदी बोथट झाल्यायत......
म्हणजे पुरुषार्थ हळूहळू संपावा तशा
सोनसळीतल्या पिंगा घालणाऱ्या उन्हाच्या तिरपेसारखा
अनावृत्त ...........

त्याला काळाची बोचणी निःसंशय
दीर्घ श्वासांसहित अल्लाद वेढावत येते
वेळूच्या बनातून..................
आता तो त्याचे दोन्ही पाय सरकणाऱ्या वाळूवर
अधिकच गच्च रोवतो तेव्हा पायाखालची वाळू
वितळत जाते त्याच्या पेंटिंग्जमधून......
हॅटवरील मेणबत्तीसारखी......मेणबत्ती
सतारीवर हलणाऱ्या कोवळ्या बोटांसारखी
वाऱ्यावर दोलायमान होते......तसा व्हॅन गॉख
त्याच्या भावाला सांगतो......वाळूत पाय गच्च रोवले गेलेयत का
हे पुन्हा एकदा नीटसं अजमावून पाहातो......आपल्याच भेगा पडलेल्या
तळव्यांनी......आणि आवाजाला प्रक्षोभकतेचं स्वरूप
न येऊ देता सांगतो......सुरूच्या झाडातून
o s s s brother
please
give me a wife and children !
Brother " Please try to understand me ! "
...........................................................

त्याच्या हॅटवरील घेरावर आता किती तरी विचारांची
जळमटं साचलेली असतात
प्रत्येक जळमटातल्या कप्प्यात एकेक
याप्रमाणं सिंहाच्या आयाळी असतात, जातककथेत
प्रचंड प्रस्थानी शब्दांना हल्ला साहवतांनासारख्या
......मेणबत्तीचा दोलायमान होणारा
लुकलुकता आकार आता अधिकच पेट घेतो
तेव्हा व्यासपीठावरील मुंग्यांची बरीच गाळण उडते......
...........................................................
खेड्यातील सर्वच लक्ष्मणरेषांबाहेरून कुणी तरी
जख्ख कुंपण घातलेलं......जसं बाईने प्रतीकासाठी

कुंकवाचा वापर करावा संस्कृतीच्या शेखीसाठी......
व्हॅनगॉख संपूर्णत: मस्त पण अस्ताव्यस्त पाय
हळूहळू पसरतो तेव्हा त्याच्या लक्षात येतं की
आता सिंहाच्या आयाळी त्याच्या पायांच्या भेगातून
मेंदूपर्यंत झिणझिण्या आणू पाहातायत......
क्षितिजरेषेवर सर्व खाटाच खाटा
प्रत्येक खाटेवर संभोगासाठी आसुसलेलं जोडपं
अगदी बिनदिक्कत नग्नावस्थेत रतिक्रीडेत
आणि
व्हॅन गॉखची बोटं रंग पिऊन तृप्त झालेली
सळसळायला लागतात......
ऊर्ध्वगामी भूकंपासारखी...........
अमृता प्रीतमचा..... काश......काय किंवा व्हॅनगॉखचा अवकाश
सगळेच अस्वस्थ अगदी अलिप्त अविरत......

त्याच्या डोळयाच्या निळसर बुभुळातून हळूहळू
सोनवर्खी पक्षी पापण्यांवर साचतात......
मोठ्या स्वच्छंदानं झोके घेतात तेव्हा
त्याच्या सिगारेटीतून सुटणारं प्रचंड धुराडं
पक्ष्यांच्या पंखात मुरतं......इतकं मुरतं की
सगळा परिसर केविलवाणा होतो आणि पुन्हा
क्षितिजरेषा कुत्सित हसते......कुण्या संस्कृतीच्या
पांघरुणाखालून वेश्यांचा तांडा चालवणाऱ्या
कोठीवालीसारखा......जनमत अजमावून !
ह्या सगळ्या गोष्टी व्हॅनगॉखच्या प्रचंड घेर असलेल्या
अस्ताव्यस्त टोपीवरील मेणबत्ती हळूहळू पाहाते
तिचे डोळे लाल होतात आणि ती हळूहळू व्हॅनगॉखच्या
काळजात शिरते तेव्हा गॉखला वाटतं
आज आपली आई पुन्हा परतून आलीय......

आपल्याकडे कपोलकल्पित उत्पातासारखी......
काही भूगर्भातील लाव्हा ढोसलेली अस्वलं
त्यांच्या केसांना शहारे आणवून हळूहळू
व्हॅनगॉखकडे वळतात गालीबचा मैखाना समजून
आणि व्हॅनगॉखचा पेला रितारिता......
काळानं झडप घालून भूमीचा गर्भ एका दमात
गिळावा तसा......

आता व्हॅनगॉख संपूर्ण झोपलेला आहे......
तशी त्याला पूर्ण झोप कधी येतच नाही......आली तरी
ती अर्धवट असते......त्याच्या डोळ्यावर उच्छाद
मांडू पाहणारी कातडी प्रकाशाला ट्रान्सपरन्ट असते......
मांजरांची पावलं बर्फातून हळूहळू
स्वेटरची बटनं कुरतडत येतात आणि
आपल्या पावलांचे ठसे सर्वत्र उमटवीत जातात
......प्रत्येक पावलात स्मितरेषा...................
हळूहळू सापांचे धागेधागे एकमेकांत
गुरफटतात तेव्हा व्हॅनगॉख इतका झोपतो
की त्याच्या नाकपुड्यातून हळूहळू सिंह
बाहेर उतरतात आणि तशा निबिड भयाण
अरण्यात
प्रचंड गर्जनांचा उच्छाद मांडतात......
आता व्हॅनगाख सताड टेकड्यांच्या
टोळक्यासारखा दनतो.......................
त्याच्या अंगाखालील जमीन आतून उंदरांनी
इतकी पोखरलेली असते की जसं त्याच्या
काळजाचं आणि जमिनीचं सख्खेपण दाखवायचंय............
तो झोपतो तेव्हा त्याच्या उशाखाली
सूत कातून तट्तट् झालेल्या हाडांचा

मुरूच्या झाडांसहित काफिला भोवऱ्याच्या
पृष्ठभागावर इतका संतुष्ट संचयित होतो
की संभोगून झालेल्या निळ्या डोळ्यातील
तृप्ती कमी पडावी......वीर्यांची किंमत कमी व्हावी......
....................................................................

सुनसान......शांत......उदास......उदास......
सर्वच रुग्णांच्या खाटा......विव्हळतायत प्रेतं......
मन:चक्षूतली सर्वच स्वप्नं
गाफिल झाल्यासारखी ................
वेड्यांचं इस्पितळ प्रलयंकारी लक्ष्मणरेषेवर
अजिंक्य मिळवणारं गल्थानांच्या उत्थानगुंफा............
........................................................................

अणू रेणू सर्वच काही कसे केव्हा
सरपटत येतात हिमनगासारखे विदूषकांच्या
चेहऱ्यातून आणि............
आणि सरपटणारे तंतू जिवाणू पाहातात
झोपेतल्या व्हॅन गॉखला माकडहाड आहे का ?
सिद्ध झालं पाहिजे होतं मानवाचे वंशज
माकडं आहेत...........माकडांचा......त्यांच्या चेहऱ्याचा
आणि माकडाच्या मादीच्या हृदयातून घरंगळत जाणाऱ्या
विकल्प विखारांचा.................
नखांना कमळदलं बनवू पाहणारी औलाद
सार्वभौमत्वाच्या गगनचुंबी आकाश उड्डाणाला
वळसा घालते तेव्हा सर्वच सिंहांच्या आयाळी
गळून पडतात आणि व्हॅनगॉख थोडीशी अजमावून पाहातो
शेपटी आपली......अर्धवट......माकड वंशजांनी दिलेली..........
त्याच्या सुरूच्या झाडावरील पानापानामागून
माकडं फिदीफिदी हसायला लागतात उन्मत्तपण

बर्फाच्या पट्टेच्या पट्टे सर्वच घसरत इतस्तत: येतात
आणि माकडांचं हसणं वाढतं......वाढतच जातं............
वंशजांच्या साहचर्याजवळून वक्षस्थळं सिद्ध करण्यासाठी......
........................................................................

माकडांची मादी आता व्हॅनगाखच्या अधिकच जवळ येते
आणि आपादमस्तक चुंबन घेत राहाते....
त्याच्या टाचांच्या भेगांतून उंदरं बाहेर पडतात
तेव्हा ती तिथूनच आत प्रवेश करते.......
त्याच्या खालील सर्व जमीन आतून पोखरलेली...............
तुझ्या अवकाशातलं सुर्यफूल वरचेवर फुलतंय : व्हॅनगॉख
तुझ्या कानाचं रक्त ठिबकतंय माझ्या स्वप्नात
: रोज रात्री.,.....

•

REFBK-0025573